**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

जावक क्र. : व.वि.श.म./आरोग्य/४५२/२०२३
दिनांक : २४/०७/२०२३

## फेर जाहिर सुचना

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत दैनंदिन कचरा संकलन, रस्ते सफाई, गटार सफाई या त्रैवार्षिक निविदा प्रक्रिये विरूद्ध निविदा कारांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४३३८४३३९/२०२३ दाखल केली होती. व सदरच्या याचीकेवर मा. उच्च न्यायालयाने मनपाच्या लवादासमोर (ARBITRATOR) सुनावणी घेण्याचे आदेश दिनांक ०३/०५/२०२३ रोजी दिले आहेत. याबाबत जाहीर सुचना प्रसिद्ध केली असता अल्प प्रतिसाद लाभल्याने पुन:श्च फेर जाहिर सुचना मागविणेत येत आहे.

तरी, मनपाकडून ARBITRATOR नेमणुक करावयाची आहे. त्यासाठी निवृत्त न्यायाधिश, वरिष्ठ वकिल किंवा लवादाचे कामकाज पाहिलेले व्यावसायीक यापैकी इच्छुक उमेदवार यांचेकडे खालीलप्रमाणे निकष असणे क्रमप्राप्त आहे.

१) न्यायालयाचा किमान दहा वर्षाचा अनुभव असावा.
२) लवादाचे (ARBITRATOR) काम केल्याचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
३) लवादाची (ARBITRATOR) सुनावणी करिता घेण्यात आलेला कालावधी नमुद करणे आवश्यक.
४) लवाद म्हणून यशस्वीपणे काम केलेल्या प्रकरणांची संख्या नमुद करावी.
५) IIAC ( इंडियन इंटरनॅशनल आरबीट्रेशन सेंटर) अथवा तत्सम संस्थेच्या इम्पॅनल असणे आवश्यक आहे.
६) लवादाच्या (ARBITRATOR) नेमणूकीसाठी घेण्यात येणारी फी नमुद करणे आवश्यक आहे.
७) नेमणूक केलेल्या लवादानी सदर प्रकरणाचा निर्णय १ महिन्याच्या आत लावणे बंधनकारक असेल.
८) प्राप्त अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक यांचा असेल.

तरी इच्छुकांनी (ARBITRATOR) उपरोक्त निकष पूर्ण करून दि.३१/०७/२०२३ पर्यंत महानगरपालिकेच्या निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे dmc.vvcmc@gmail.com या ई-मेलवर अथवा निम्न स्वाक्षरीकार यांच्या आवक-जावक कक्षात मुळप्रतीसह आपला प्रस्ताव सादर करावा.

(डॉ. चारूशिला पंडीत)
उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका